**दिनांक ११.०३.२०२६ रोजी माळीवाडा, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर येथे अंजीर लागवडीचे शेतीस भेट व पाहणी तसेच अंजीर उत्पादक शेतक-यांचा सत्कार**





दिनांक ११.०३.२०२६ रोजी तिसगाव तांडा, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कै. चांगदेव राठोड यांच्या कुटुंबास भेट





पुण्य नगरी

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना विविध योजनांचा लाभ द्या

## ॲड. नीलेश हेलोंढे पाटील यांचे सांत्वन भेटीत अधिकाऱ्यांना निर्देश

**कन्नड शहर/ खुलताबाद :** वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंढे पाटील यांनी खुलताबाद आणि कन्नड तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. या कुटुंबियांनामहसूल, शिक्षण, आरोग्य. कौशल्य विकास विभागाच्या योजनांच्या लाभ मिळवून देण्याबाबत त्यांनी संबंधित यंत्रणेला निर्देशित केले.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नीला आर्थिक योजनांचा लाभ मिळण्यासाठीचे योग्य ती कार्यवाही करून महिला बालकल्याण आणि कृषी विभाग तसेच महसूल विभागाला निर्देशित केले.

खुलताबाद तालुक्यातील तिसगाव तांडा येथे आत्महत्या केलेले शेतकरी चांगदेव राठोड यांच्या घरी भेट दिली व कुटुंबातील सदस्यांना धीर देऊन सांत्वन केले .कन्नड तालुक्यातील सासेगाव येथे स्व. मिठूसिंग रुपसिंग सुलाने यांच्या कुटुंबियातील सदस्याची विचारपूस केली. मुलांच्या शिक्षणासंदर्भातील आर्थिक मदत व शैक्षणिक मदती संदर्भातही संबंधित विभागाला सूचित केले. यावेळी गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, तहसीलदार पांढरे, कन्नड तालुका कृषी अधिकारी,अन्य संबंधित विभागाचे अधिकारी समवेत होते.



आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे सांत्वन करताना मान्यवर.

### जिल्ह्यात जलतारा प्रकल्प अंमलबजावणीचे निर्देश

1. जिल्ह्यात काही तालुक्यात जमिनीतील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी जलतारा प्रकल्प राबविल्याचे निर्देश वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंढे पाटील यांनी गुरुवारी (दि.१२) आयोजित बैठकीत दिले.
2. जलतारा प्रकल्प राबविण्यासाठी कृषी विभाग, जलसंधारण, भूजल सर्वेक्षण, जिल्हा प्रशासन आणि विविध सामाजिक संस्थांचा सहभाग घेण्यात येईल, असे ॲड. हेलोंढे पाटील म्हणाले.
3. बैठकीसाठी भूजल सर्वेक्षण विभागाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण अधिकारी जीवन बडेवाल, सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी ए. बी. शेख उपस्थित होते.

Chhatrapati Smabhajinagar Edition
Mar 13, 2026 Page No. 06
Powered by: erelego.com

दिनांक ११.०३.२०२६ सासेगांव, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी
कै. मिठ्ठूसिंग रुपसिंग सुलाने यांच्या कुटुंबास भेट





दिनांक ११.०३.२०२६ रोजी आंबा, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर येथे आत्महत्त्याग्रस्त शेतकरी कै. विश्वास साहेबराव तावरे, यांच्या कुटुंबास भेट





दैनिक
अग्रलेखांचा बादशहा भूमिपुत्रांचा मित्र!
लोकपत्र

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या समस्यांचे तात्काळ निराकरण करा: राज्यमंत्री निलेश हेमांडे

**कन्नड/प्रतिनिधी**

कन्नड तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाच्या योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करा आणि त्यांच्या सर्व समस्या सोडवून तसा अहवाल सादर करा, असे स्पष्ट निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) एड. निलेश हेमांडे पाटील यांनी दिले.बुधवार दिनांक ११ मार्च २०२६ रोजी त्यांनी कन्नड तालुक्यातील सासेगाव आणि आंबा येथील आत्म हत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेऊन सांत्वन केले आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रत्यक्ष भेटीतून समोर आली. राज्यमंत्री निलेश हेमांडे पाटील यांनी सासेगाव येथील लताबाई मिठूसिंग सुलाने आणि आंबा येथील सविता विश्वास तावरे या कुटुंबांची भेट घेतली. यावेळी चर्चेदरम्यान,



आम्हाला अद्यापपर्यंत शासनाचे कोणतेही अपेक्षित लाभ मिळालेले नाहीत, अशी कैफियत बाधित कुटुंबांनी मांडली. कुटुंबातील मुख्य व्यक्ती गेल्यानंतर जगायचे कसे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. शेतकरी कुटुंबांच्या या तक्रारींची गंभीर दखल घेत, हेमांडे पाटील यांनी उपस्थित असलेल्या सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळावरूनच कडक सूचनादिल्या.प्रशासनाला महत्त्वाचे

**निर्देश देतांना संयुक्त**

मोहीम: महसूल विभाग, पंचायत समिती, कृषी विभाग आणि महिला व बालविकास विभागाने समन्वय राखून प्रलंबित लाभ तात्काळ द्यावेत अशा सूचना दिल्या.तसेच तालुक्यातील सर्व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी तालुका स्तरावर विशेष शिबिर आयोजित करून त्यांच्या अडचणी जागेवरच निकाली काढाव्यात. यासह केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल मि शन कार्यालयाला सादर करण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच शेतकरी कुटुंबांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही.प्रशासनाने संवेदनशील राहून या कुटुंबांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन ही निलेश हेमांडे पाटील यांनी यावेळी केले.या दौऱ्याप्रसंगी तहसीलदार श्रीमती सारिका भगत, जनसंपर्क अधिकारी कृष्णकुमार देठे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी म हेंद्र दराडे, मिशन कार्यालयाचे अनिल निकम, खुलताबादचे उज्ज्वल हर्षल पाटील, तालुका कृषी अधिकारी शिरसाट, सहाय्यक गटविकास अधिकारी, मंडळ अधिकारी विकास वाघ, भाग्यवंत, ग्राम महसूल अधिकारी दीपक एरंडे, अनिल गायकी, ए. डी. घोलप, बाळू घाटे यांच्यासह विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

पुढारी



ॲड. नीलेश हेमांडे पाटील यांनी तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची भेट घेतली होती.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या समस्या तात्काळ सोडवा : हेमांडे पाटील

**कन्नड, पुढारी वृत्तसेवा :** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे राज्य अध्यक्ष ॲड. नीलेश हेमांडे पाटील यांनी तालुक्यातील सासेगाव व आंबा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.सासेगाव येथील लताबाई मिठूसिंग सुलाने तसेच आंबा येथील सविता विश्वास तावरे या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांची त्यांनी भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी संबंधित कुटुंबीयांनी अद्यापपर्यंत शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ मिळालेला नसल्याची माहिती दिली. ही बाब गांभीर्याने घेत ॲड. हेमांडे पाटील यांनी महसूल विभाग, पंचायत समिती, कृषी विभाग, महिला व बालकल्याण विभाग आदी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तालुक्यातील सर्व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना तात्काळ शासकीय योजनांचा लाभ देण्याच्या सूचना दिल्या. तसेच तालुक्यातील सर्व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील सदस्यांसाठी तालुकास्तरावर विशेष शिबिर आयोजित करून त्यांच्या समस्या सोडवाव्यात व त्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले.यावेळी तहसीलदार सारिका भगत, जनसंपर्क अधिकारी कृष्णकुमार देठे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी छत्रपती संभाजीनगर महेंद्र दराडे, मिशन कार्यालयाचे अनिल निकम,तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाट, हर्षल पाटील, मंडळ अधिकारी विकास वाघ, ग्राम महसूल अधिकारी दीपक एरंडे, अनिल गायके , ए. डी. घोलप, बाळू घाटे आदी उपस्थित होते.

पुढारी

# शेतकरी कुटुंबांच्या समस्या सोडवा : हेमांडे पाटील

**कन्नड, पुढारी वृत्तसेवा :** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे राज्य अध्यक्ष अॅड. नीलेश हेमांडे पाटील यांनी तालुक्यातील सासेगाव व आंबा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.


सासेगाव येथील लताबाई मिठूसिंग सुलाने तसेच आंबा येथील सविता विश्वास तावरे या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांची त्यांनी भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी संबंधित कुटुंबीयांनी अद्यापपर्यंत शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ मिळालेला नसल्याची माहिती दिली. ही बाब गांभीर्याने घेत अॅड. हेमांडे पाटील यांनी महसूल विभाग, पंचायत समिती, कृषी विभाग, महिला व बालकल्याण विभाग आदी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तालुक्यातील सर्व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना तात्काळ शासकीय योजनांचा लाभ देण्याच्या सूचना दिल्या.

तसेच तालुक्यातील सर्व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील सदस्यांसाठी तालुकास्तरावर विशेष शिबिर आयोजित करून त्यांच्या समस्या सोडवाव्यात व त्याबाबतचा सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देशही त्यांनी दिले. यावेळी तहसीलदार सारिका भगत, जनसंपर्क अधिकारी कृष्णकुमार देठे, महेंद्र दराडे, मिशन कार्यालयाचे अनिल निकम, तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाट, हर्षल पाटील, मंडळ अधिकारी विकास वाघ, ग्राम महसूल अधिकारी दीपक एरंडे, अनिल गायके, ए. डी. घोलप, बाळू घाटे उपस्थित होते.

Chhatrapati Sambhaji Nagar Edition
Mar 15, 2026 Page No. 11
Powered by: erelego.com

दिनांक ११.०३.२०२६ रोजी शासकीय विश्रामग्रह कन्नड येथे, तहसीलदार कन्नड आणि जिल्हा महिला बालविकास अधिकारी छत्रपती संभाजीनगर, बालविकास प्रकल्प अधिकारी कन्नड/खुलताबाद, तालुका कृषी अधिकारी आणि अन्य शासकीय अधिकारी समवेत बैठक येथे तालुकास्तरीय अधिकारी यांचे समवेत बैठक





**दिनांक १२.०३.२०२६ रोजी जमीनीची सुपिकता आणि पाणी पातळी वाढविण्याबाबत (जलतारा संदर्भात) जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी, वरीष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर यांचे समवेत छत्रपती संभाजीनगर येथील मिशनचे कार्यालयात बैठक व चर्चा**





**दिनांक १२.०३.२०२६ रोजी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबास CSR फंडातून मदत करणे बाबत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचे समवेत छत्रपती संभाजीनगर येथील मिशनचे कार्यालयात बैठक व चर्चा**





**दिनांक १२.०३.२०२६ रोजी चारा लागवड व संगमनेर पॅटर्न राबविण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, उपायुक्त पशुसंवर्धन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे समवेत छत्रपती संभाजीनगर येथील मिशनचे कार्यालयात बैठक व चर्चा**





**दिनांक १२.०३.२०२६ रोजी मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे समवेत शेतमजूर, शेतकरी यांचे मुलांना परीक्षा शुल्क माफी बाबत बैठक व चर्चा**



दिनांक १४.०३.२०२६ रोजी अंबाडा ता. काटोल, जि. नागपूर येथे चारा लागवड स्थळी भेट व पाहणी



दिनांक १६.०३.२०२६ रोजी हिंगणघाट, जि. वर्धा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीस भेट व कोल्ड स्टोअरेजची पाहणी





दिनांक 18.03.2026 रोजी निमगव्हाण, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथे मृतक मनोज बकाराम भुते शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट





# अॅड.निलेश हेलोंडे यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची घेतली भेट

## विविध योजनेतून मदत करण्याचे अधिकाऱ्यांना दिले निर्देश



नमस्कार अमरावती

चांदूर रेल्वे (ता. प्र.) दि.२३ : तालुका दौऱ्यावर आलेले वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे राज्यमंत्री दर्जा प्राप्त अध्यक्ष अॅड. निलेश हेलोंडे यांनी स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित सभेत चांदूर रेल्वे तालुक्यातील महसूल विभाग, कृषि विभाग,पशु संवर्धन विभाग, महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांच्या कामांचा आढावा घेतला. त्यानंतर तालुक्यातील निमगव्हाण येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी मनोज बकाराम भुते यांच्या घरी जावून त्यांच्या कुटूंबांची अधिकाऱ्यासोबत भेट घेवून त्यांचे सात्वन केले आणि त्यांना शासनाच्या वतीने विविध योजनेतून मदत देण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश दिले. अॅड. निलेश हेलोंडे यांनी चांदूर रेल्वे येथील विश्रामगृह येथे चांदूर रेल्वे तालुक्यातील महसूल विभाग, कृषि विभाग,पशु संवर्धन विभाग पंचायत समिती,चांदूर रेल्वे तसेच महिला बालविकास विभागाच्या कामांचा आढावा घेतला.

त्यानंतर ते मनोज बकाराम भुते या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी निमगव्हाण या गावी अधिकारी व कर्मचाऱ्यांसह भेट दिली. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची पत्नी श्रीमती वनिता मनोज भुते व त्यांचे दोन मुले व त्यांची वृद्ध आई यांची भेट घेऊन आपल्या दुःखात सहभागी असल्याचे सांगितले. तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी यांचा मुलगा व मुलीसोबत संवाद साधून शिक्षणामध्ये येणाऱ्या अडीअडचणीबाबत चर्चा केली. त्यांना शिक्षणासाठी कोणती मदत अपेक्षित आहे हे सुद्धा विचारले. त्यांना लागणारी सर्व मदत शासनाच्या विविध योजनेमधून देण्याची अधिकारी व कर्मचाऱ्यांना निर्देश दिले.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पत्नीसोबतच चर्चा करून त्यांना काय मदत मिळाली याची चौकशी करून काय मदत अपेक्षित आहे याची विचारणा केली. त्यांना उपजीविकेसाठी कोणते प्रशिक्षण करायचे आहे, त्याबाबत विचारणा करून त्यांना शिलाई मशीन, ब्युटी पार्लर कोर्स साठी अॅडमिशन व त्यांचे मुलांना सायकल तसेच त्यांना नियमित गॅस पुरवठा व रेशन पुरवठा विविध शासकीय योजनेमधून देणे संबंधीत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. तसेच त्यांचे वृद्ध आईचे डोळ्याचे ऑपरेशन करून देण्याचे स्थानिक अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

या दौऱ्याच्यावेळी त्यांच्यासोबत नायब तहसीलदार अनिल चवरे, गटविकास अधिकारी डॉ. प्रफुल भोरखडे, तालुका कृषि अधिकारी संचित ढाकरे, कृषी अधिकारी रवी राणे, पशुधन विकास अधिकारी डॉ. संजय मोरे, सीडीपीओ श्रीमती यादव यांच्यासह इतर विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

देशोन्नती

# ॲड. निलेश हेलोंडे यांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाची घेतली भेट

## विविध योजनेतून मदत करण्याचे अधिकाऱ्यांना दिले निर्देश



**देशोन्नती वृत्तसंकलन**

**चांदूर रेल्वे :** चांदूर रेल्वे तालुका दौऱ्यावर आलेले वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे राज्यमंत्री दर्जा प्राप्त अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांनी स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित सभेत चांदूर रेल्वे तालुक्यातील महसूल विभाग, कृषि विभाग, पशु संवर्धन विभाग, महिला व बालविकास विभागाच्या विविध योजनांच्या कामांचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी चांदूर रेल्वे तालुक्यातील निमगव्हाण येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी मनोज बकाराम भुते यांच्या घरी जावून त्यांच्या कुटूंबांची अधिकाऱ्यासोबत भेट घेवून त्यांचे सात्वन केले आणि त्यांना शासनाच्या वतीने विविध योजनेतून मदत देण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

ॲड. निलेश हेलोंडे यांनी चांदूर रेल्वे येथील विश्रामगृह येथे चांदूर रेल्वे तालुक्यातील महसूल विभाग, कृषि विभाग, पशु संवर्धन विभाग पंचायत समिती, चांदूर रेल्वे तसेच महिला बालविकास विभागाच्या कामांचा आढावा घेतला. त्यानंतर ते मनोज बकाराम भुते या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी निमगव्हाण या गावी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसह भेट दिली. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची पत्नी श्रीमती वनिता मनोज भुते व त्यांचे दोन मुले व त्यांची वृद्ध आई यांची भेट घेऊन आम्ही सर्वजण व महाराष्ट्र शासन आपल्या दुःखात सहभागी असल्याचे सांगितले. तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी यांचा मुलगा व मुलगी यांच्या सोबत संवाद साधून त्यांना मोठेपणी काय होण्याची इच्छा आहे याची विचारणा करून त्यांना शिक्षणामध्ये येणाऱ्या अडीअडचणी बाबत चर्चा केली. त्यांना उपजीविकेसाठी कोणते प्रशिक्षण करायचे आहे, त्याबाबत विचारणा करून त्यांना शिलाई मशीन, ब्युटी पार्लर कोर्स साठी ॲडमिशन व त्यांचे मुलांना सायकल तसेच त्यांना नियमित गॅस पुरवठा व रेशन पुरवठा विविध शासकीय योजनेमधून देणे संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. तसेच त्यांचे वृद्ध आईचे डोळयाचे ऑपरेशन करून सुद्धा देण्याचे स्थानिक अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

या दौऱ्याच्यावेळी त्यांच्यासोबत चांदूर रेल्वे नायब तहसिलदार अनिल चवरे, चांदूर रेल्वे गटविकास अधिकारी डॉ. प्रफुल भोरखडे, तालुका कृषि अधिकारी संचित ढाकरे, कृषि अधिकारी (पं. स.) रवि राणे, पशुधन विकास अधिकारी डॉ. संजय मोरे, चांदूर रेल्वे सीडीपीओ श्रीमती यादव यांच्यासह इतर सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

**दिनांक २०.०३.२०२६ रोजी सहा. संचालक, कौशल्य विकास विभाग, अमरावती यांचे समवेत ग्रामीण भागामध्ये रोजगार मेळावा आयोजीत करण्यासंबंधी दालनामध्ये बैठक व चर्चा**





दिनांक २१.०३.२०२६ रोजी लाडगांव, ता. काटोल, जि. नागपूर येथे पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ चे संशोधीत वाण AKAW-५१०० या गव्हाचे येथे बळीराजा शेतकरी सहायता गट द्वारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी





**दिनांक २५.०३.२०२६ रोजी विश्रामगृह, पुसद जि. यवतमाळ येथे प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदीवासी विकास प्रकल्प, तहसिलदार, गटविकास अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी व इतर संबंधीत अधिकारी यांचे समवेत शेतकरी आत्महत्या व चारा लागवडसंबंधी बैठक व चर्चा**





दिनांक २५.०३.२०२६ रोजी रोहडा, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे मृतक  गणेश शालीकराम पोपाळघट यांचे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट






देशोन्नती

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला निलेश हेलोंडे पाटील यांची भेट

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुसद :** तालुक्याच्या दौऱ्यावर आलेले राज्याचे कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन निलेश हेलोंडे पाटील यांनी विश्रामगृहावर तालुक्यातील सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन योग्य त्या सूचना दिल्या. त्यानंतर तालुक्यातील रोहडा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी स्व. गणेश पोपळघट यांच्या कुटुंबियांची सर्व अधिकाऱ्यांसमवेत भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. कुटुंबास आवश्यक असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याचे निर्देश उपस्थित अधिकारी वर्गास दिले.

यावेळी विजय मुकाडे उपविभागीय कृषि अधिकारी पुसद, गाडे नायब तहसीलदार पुसद, अमोल कुमार आंदेलवाड गटविकास अधिकारी पुसद, पशुधन



विकास अधिकारी तथा सरपंच रेखाताई पायघन, पोलीस पाटील राजकुमार पारिसकर विविध विभागाचे कर्मचारी अधिकारी तथा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(ता.प्र.)**

लोकमत



# उत्पन्न वाढीसाठी शेतीसोबत दुग्धोत्पादन जोडधंदा करावा

## नीलेश हेलोंडे : रोहडा येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबाची भेट घेऊन केले सांत्वन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुसद** : शेती व्यवसायासोबत पशुपालन-दुग्धोत्पादन हा जोडधंदा केल्यास भविष्यात शेतकरी बांधव आलेल्या संकटाशी भक्कमपणे दोन हात करू शकतील, असा आशावाद वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष नीलेश हेलोंडे यांनी व्यक्त केला.

पुसद तालुक्यातील रोहडा येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी गणेश पोपळघट यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबास आवश्यक असलेल्या विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याचे निर्देश उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. आत्महत्या हा आपल्या समाजास लागलेला कलंक असून, शेती व्यवसायासोबत दुग्धोत्पादन हा जोडधंदा करावा, असे आवाहन हेलोंडे यांनी केले. यावेळी तालुक्यातील अधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृहात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी विजय मुकाडे, परिविक्षाधीन तहसीलदार योगेश गाडे, गटविकास अधिकारी अमोलकुमार आंदेलवाड, पशुधन विकास अधिकारी, सरपंच रेखा पायघन, राजकुमार पारिसकर आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

**विश्रामगृहात विविध विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत नीलेश हेलोंडे यांनी आढावा बैठक घेतली**